वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि.१० डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# शाळा - कॉलेज परिसरात गुटखा विक्रेत्यांना 'मोका' लावणार

## कायद्यात बदल करणार, मुख्यमंत्री फडणवीस यांची विधानसभेत घोषणा



Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

### गुटखा विक्रीचे विद्यमान कायदे कमकुवत, गुटखा तस्कर लगेच जामिनावर सुटतात, कायद्यात मोका च्या दृष्टीने सुधारणा करणार

नागपूर, (दिव्य न्युज):- राज्यातील शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात गुटखा, तंबाखू आणि अमली पदार्थ विकणाऱ्यांवर तसेच राज्यात गुटखा तस्करी आणि विक्री करणाऱ्याविरोधात आता 'मोका' (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा) अंतर्गत कारवाई केली जाणार आहे. त्यासाठी कायद्यात बदल करून अशा प्रकरणांमध्ये 'मोका' लावण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली.

आमदार प्रशांत ठाकूर, अस्लम शेख, अभिमन्यू पवार, रईस शेख, अमीन पटेल यांनी शाळा, महाविद्यालय परिसरात गुटखा विक्री आणि वाहतुकीसंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नास उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. ते म्हणाले, गुटखा विक्री करणाऱ्यांवर 'मोका' लागू करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. मात्र, धमकी आणि इजा पोहोचविणे या दोन कृती या प्रकरणात घडत नसल्याने 'मोका' लावता येणार नसल्याचा अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिला. मोका कायद्यात संघटितपणे धमकी देणे तसेच सामूहिकरीत्या इजा पोहोचविणे या बाबी आवश्यक ठरतात. त्यामुळे या कायद्यातच बदल करत गुटखा व्यवसाय करणाऱ्यांवरही 'मोका' लागू करता येईल, अशा दुरुस्त्या कायद्यात करण्याची सूचना केली आहे. या सुधारणांनंतर हा कायदा अधिक कठोर करण्यात होईल, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. विद्यमान कायदे कमकुवत असल्याने गुटखा तस्करी करणारे लगेच जामिनावर सुटतात. त्यामुळे कायद्यात सुधारणा करण्याचा मनोदय मुख्यमंत्र्यांनी बोलून दाखविला.

राज्यात गुटखाबंदी आहे. गुटखा विक्री व वहनसंदर्भात राज्यभरात पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर कारवाई

▸▸ पान २ वर

# कुत्र्यांचा प्रश्न विधानसभेत

### दोन्ही बाजुंच्या सदस्यांची सभागृहात आक्रमक भूमिका

**नागपुर, (दिव्य न्युज):- राज्यातील भटक्या कुत्र्यांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना हा मुद्दा मंगळवारी विधानसभेत उपस्थित करण्यात आला. यावरून दोन्ही बाजूंच्या सदस्यांनी कुत्र्यांमुळे उद्भवलेल्या दुर्घटनांची जंत्रीच मांडली. 'कुत्र्यांचा बंदोबस्त करा, अन्यथा प्राणीमित्र संघटनांच्या घरी त्यांना सोडा,' असा आक्रमक पवित्रा त्यांनी घेतला. अखेर या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन याच आठवड्यात लोकप्रतिनिधी आणि संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन मार्ग काढण्याचे आश्वासन सभागृहात देण्यात आले.**



भटक्या कुत्र्यांच्या दहशतीबाबत विधानसभेत लक्षवेधी मांडण्यात आली. आमदार अतुल भातखळकर, महेश लांडगे यांनी ही लक्षवेधी मांडली. 'भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात हजारो नागरिकांनी आपले प्राण गमावले आहेत. या कुत्र्यांचे निर्बिजीकरण आणि निवारे याबाबत सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट सूचना दिल्या असताना सरकारकडून नेमके काय सुरू आहे, हे स्पष्ट करावे, 'मुंबईतील मोकळे भूखंड ताब्यात घेऊन तिथे तात्पुरती सोय करावी,' अशी मागणीही त्यांनी केली. प्रकाश सुर्वे यांनी बिबट्यांपेक्षा भटक्या कुत्र्यांचा प्रश्न गंभीर असल्याचे अधोरेखित केले. ' 'भटक्या कुत्र्यांच्या दहशतीमुळे महिला बाहेर पडू शकत नाहीत,' असे आमदार सुनील प्रभू म्हणाले.

भाजपचे महेश लांडगे यांनी आक्रमक भूमिका घेतली. 'काही प्राणीमित्र भटक्या कुत्र्यांची बाजू घेतात. मात्र, त्यामुळे नागरिकांना काय त्रास होतो याचा ते विचार करीत नाहीत. या संघटनांचे कुत्र्यांवर प्रेम आहे परंतु माणसांवर त्यांचे प्रेम दिसत नाही.भटक्या कुत्र्यांना या प्राणीमित्र संघटनांच्या कार्यकर्त्यांकडेच सोडा,' असे लांडगे म्हणाले. ▸▸ पान २ वर

### याच आठवड्यात बैठक

'सर्वोच्च न्यायाल न्यायालयाच्या सूचनेप्रमाणे निवारा; तसेच निर्बिजीकरणाची अंमलबजावणी सुरू आहे,' अशी माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिली. मात्र, यावर सदस्यांचे समाधान झाले नाही. यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याच आठवड्यात उपमुख्यमंत्री आणि नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे आणि विभागाच्या राज्यमंत्र्यांच्या उपस्थितीत लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांची बैठक घेण्याचे आश्वासन दिले.

### लोकप्रतिनिधींची बैठक घेणार

राज्यातील मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी वन विभागाकडून ठोस उपाययोजना करण्यात येत आहेत. भविष्यात एकही मनुष्य मृत्युमुखी पडणार नाही यासाठी यंत्रणा सतर्क केली आहे. या संदर्भात लोकप्रतिनिधींची बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी मंगळवारी विधानसभेत दिली. या संदर्भात मांडण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेला नाईक यांनी उत्तर दिले.

# आष्टीच्या रस्त्यावर दोन बिबट्यांचा 'नाइट वॉक'

### शेतकरी, प्रवाशांमध्ये दहशत!



कडा , (दिव्य न्युज):- आष्टी तालुक्यातील किन्ही गावाजवळ रहदारीच्या रस्त्यावर एकाच वेळी एक-दोन नव्हे तर तब्बल तीन बिबटे आढळून आल्यामुळे प्रवाशांच्या मनात मोठी धडकी भरली आहे. एका प्रवाशाने प्रसंगावधान राखून आपल्या कॅमेऱ्यात कैद केलेला हा थरारक व्हिडिओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. ऑक्टोबर महिन्यात याच परिसरात बिबट्याने एका शेतकऱ्याचा बळी घेतल्यामुळे नागरिकांमध्ये आता प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे.मंगळवारी रात्रीच्या सुमारास डोईठाण-आष्टी रस्त्यावरील किन्ही गावाजवळच्या पुलाजवळ एका प्रवाशाला अचानक तीन बिबटे रस्त्यावर पान २ वर

### तहसीलदारांची बनावट सही करून आदेश पारित केल्याचा आरोप

# तत्कालीन नायब तहसीलदाराविरुद्ध तहसिलदाराने फसवणुकीचा गुन्हा दाखल

### जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर केज पोलिसात तक्रार

**केज , (दिव्य न्युज):- केज तालुक्यात प्रशासनाला हादरवून सोडणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. तहसीलदारांच्या बनावट सह्या करून अर्धन्यायिक प्रकरणाचा आदेश पारित केल्याप्रकरणी तत्कालीन नायब तहसीलदाराविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केजचे तहसीलदार यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार केज पोलिस ठाण्यात ही तक्रार नोंदवली असून संपूर्ण महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १५५ अंतर्गत अर्धन्यायिक अधिकार हे तहसीलदारांना दिलेले असतात. मात्र, संबंधित प्रकरणात तत्कालीन नायब तहसीलदारांनी स्वतःहून तहसीलदारांचे अधिकार वापरून आदेश पारित केल्याची गंभीर बाब समोर आली आहे. याशिवाय, आदेशावर तहसीलदारांच्या नावाने बनावट स्वाक्षरी करून तो आदेश ग्राममहसूल अधिकारी तसेच तलाठी कार्यालयाला पाठवण्यात आल्याचेही चौकशीत उघड झाले.**




ही बाब उघडकीस आल्या नंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने तातडीने तपासाचे आदेश दिले. सखोल चौकशीत आदेशातील सही बनावट असल्याची पुष्टी झाली. तसेच हे आदेश देण्या संदर्भातील प्रक्रिया बेकायदेशीर व नियमबाह्य असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर केज तहसीलदार राकेश गिड्डे यांनी तत्काकालीन नायब तहसीलदार तथा संभाजी नगरच्या जिल्हाधिकारी कार्यालयातील संजय गांधी विभागाच्या तहसीलदार आशा वाघ यांच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात अधिकृतपणे पोलिसात तक्रार नोंदवली.

▸▸ पान २ वर

# महाराष्ट्रात भीक मागण्यास बंदी!

## विधान परिषदेत विधेयक मंजूर

नागपुर , (दिव्य न्युज):- महाराष्ट्रात भीक मागण्यास आळा घालण्यासाठी तयार करण्यात आलेले महत्वाचे विधेयक आज विधान परिषदेत गोंधळाच्या स्थितीत मंजूर करण्यात आले. हिवाळी अधिवेशनातील कामकाजादरम्यान अनेक सदस्यांनी या विधेयकाबाबत असमाधान व्यक्त केले. तरीही चर्चेच्या गोंधळातच हे विधेयक मंजूर झाल्याने वाद निर्माण झाला आहे. राज्यभरात भीक मागण्यावर प्रतिबंध आणण्याच्या या कायद्याने पुढील काही दिवसांत मोठी चर्चा रंगण्याची शक्यता आहे.



नागपूर येथील विद्यमान अधिवेशनात मंत्री अदिती तटकरे यांनी हे विधेयक मांडले. मात्र, अनेक सदस्यांनी विधेयकातील शब्दप्रयोग, त्याचा उद्देश, आणि स्पष्टीकरणात असलेले विसंगतीचे मुद्दे उपस्थित केले. त्यामुळे या विधेयकाच्या मंजुरीची पद्धत आणि त्यावर झालेल्या मर्यादित चर्चेवर अनेकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.विधान परिषदेत हे विधेयक मांडल्यानंतर लगेचच

▸▸ पान २ वर

# साखर कारखानदारांनी २ हजार कोटींचे ऊसबिले थकविले

## आरआरसी अंतर्गत कारवाई करा; राजू शेट्टींची साखर आयुक्तांकडे मागणी

मुंबई, (दिव्य न्युज):– राज्यातील १६३ साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू होवून जवळपास ४० दिवस होवून गेले आहेत. कारखान्यांनी गाळप केलेल्या ऊसाचे जवळपास २ हजार कोटी रूपयाचे उसबिले थकविले आहेत. संबधित साखर कारखान्यांच्यावर आरआरसी अंतर्गत कारवाई करून शेतक–यांची थकीत ऊसबिले तातडीने अदा करण्याबाबत आदेश द्यावेत अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी साखर आयुक्तांकडे केली.

साखर कारखान्यांचा गळीत हंगाम १ नोव्हेंबर पासून सुरू झाला आहे. राज्यामध्ये १६३ साखर कारखान्यांनी १५ नोव्हेंबर अखेर जवळपास १ कोटी १० लाख टन ऊसाचे गाळप केले आहे. यापैकी ३४ साखर कारखान्यांनी १०० टक्के एफआरपी. अदा केली असून १२९ साखर कारखान्यांकडे जवळपास २००५ कोटी रूपयाची एफआरपीची थकबाकी राहिली आहे. यामुळे सदर थकीत एफआरपीची रक्कम १५ टक्के व्याजासह शेतक–यांच्या खात्यावर जमा करण्याबाबत साखर आयुक्तांकडे मागणी केली.

एक रकमी एफआरपी'प्रश्नी पुढील आठवड्यात सुनावणी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वोच्च न्यायालयात एक रक्कमी एफआरपीच्या विरोधात आव्हान याचिका दाखल करून ऊस उत्पादक शेतक–यांना तीन टप्यात एफआरपी अदा करण्याची मागणी केलेली आहे. या याचिकेची सुनावणी सुरू असून येत्या १७ डिसेंबर रोजी पुढील सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. ९ नोव्हेंबर रोजी झालेल्या सुनावणीमध्ये राज्य सरकार , साखर संघ तसेच राज्यातील साखर कारखान्यांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयास स्थगिती देण्याची मागणी केली. मात्र सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती न देता पुढील आठवड्यात तातडीने सुनावणी ठेवली आहे.

सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील कारखान्यांकडून एफआरपी अदा

राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान



याचिका दाखल करून साखर कारखान्यांना पाठीशी घातल्याने राज्यातील साखर कारखाने एफआरपी देण्यास टाळाटाळ करत आहेत. विशेषता मराठवाडा व विदर्भासह सोलापूर व पुणे जिल्ह्यातील कारखान्यांची थकीत एफआरपी जादा राहिलेली असून स्वाभिमानीच्या रेट्यामुळे सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील कारखान्यांनी एक रक्कमी एफ. आर. पी. अदा केली असल्याचेही शेट्टी यांनी प्रसिद्दीपत्रकात म्हटले आहे.

# एफआयआरमध्ये पार्थ पवारांचे नाव का नाही?

## उच्च न्यायालयाचा सवाल

मुंबई, (दिव्य न्युज):– पुण्याच्या कोरेगाव पार्क येथील महार वतन जमीन खरेदी व्यवहारामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार अडचणीत सापडला आहे. या जमीन व्यवहारामध्ये अनियमितता झाल्याची प्राथमिक माहिती असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या प्रकरणात मुद्रांक शुल्क अधिकाऱ्यांनी तक्रार दाखल केल्यानंतर पार्थ पवारांना वळगत तिघांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. मात्र अमेडिया कंपनीची ९९ टक्के भागीदारी असूनही पार्थ पवार यांचे नाव एफआयआरमध्ये का नमूद करण्यात आले नाही? असा सवाल विरोधकांनी विचारला होता. मात्र हाच सवाल आता मुंबई उच्च न्यायालयाने विचारला आहे.





अमेडिया एंटरप्राइझेस एलएलपी या कंपनीमध्ये पार्थ पवार आणि त्यांचे मामेभाऊ दिग्विजय पाटील हे भागीदार आहेत. मात्र मुंढवा जमीन प्रकरण समोर आल्यानंतर पार्थ पवारांना वगळत दिग्विजय पाटील, शीतल तेजवानी आणि आणि रवींद्र तारू यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पुण्याच्या कोंढवाच्या कोरेगाव आयटी पार्क येथील जमीन पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने खरेदी केली होती. संबंधित जमिनीची पॉवर ऑफ अॅटर्नी शीतल तेजवानीकडे होती. पण तिने या पॉवर ऑफ ॲटर्नीचा वापर करून शासकीय जमीन एका खासगी कंपनीच्या नावावर केली होती. त्यामुळे आर्थिक गुन्हे शाखेने शीतल तेजवानी हिला दोन वेळा चौकशीसाठी बोलावले होते.शीतल तेजवानी दोन वेळा चौकशीला उपस्थित राहिली, मात्र मुंढवा जमीन व्यवहाराची ओरिजनल कागदपत्रे वारंवार मागूनही शीतल तेजवानीने पोलिसांनी कोणतीच कागदपत्रे दिली नाहीत. त्यामुळे शीतल तेजवानी हिने खोट्या कागदपत्रांचा वापर करून पॉवर ऑफ ॲटर्नी बनवली आणि शासकीय जमीन खासगी कंपनीला विक्री केल्याचा तिच्यावर आरोप आहे. तसेच मुंढवा जमीन व्यवहारात शीत तेजवानी हिचा थेट सहभाग असल्याचे स्पष्ट झाल्यावर तिच्यावर अटकेची कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर शीतल तेजवानी हिने जामीनासाठी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

पान ४ वरून

## तहसील कार्यालय

कोणतीही तयारी नाही! =४ गुत्तेदाराचे बिल नाही, हस्तांतरण नाही, पाण्याची सोयही नाही – आणि जनता मात्र हैराण! स्वच्छतागृहाचे बांधकाम पूर्ण झाले असतानाही गुत्तेदाराचे बिल निघालेले नाही, बांधकामाचे तहसील कार्यालयाकडे हस्तांतरण झालेले नाही आणि सर्वात धक्कादायक म्हणजे स्वच्छतागृहाजवळ पाण्याचीही कोणतीही व्यवस्था केलेली नाही. म्हणजे कोट्यवधींचा कारभार करणारी यंत्रणा वीस लाखांच्या स्वच्छतागृहासाठी मात्र पूर्णपणे अपयशी! =४ जनता संतप्त : स्वच्छतागृह बांधून कुलूप लावणारे अधिकारी जनतेची थट्टा करत आहेत का? महिन्यांपासून स्वच्छतागृह उभारलेले असताना ते बंदच ठेवले जाते यावरून नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे.

नागरिकांचा थेट सवाल : वीस लाख खर्च करून स्वच्छतागृह उभारले, पण त्याचा उपयोग जनतेला कधी मिळणार? हे जनतेचे पैसे आहेत की कोणाच्या प्रतिष्ठेची खेळणी? =४ तात्काळ कार्यवाहीची मागणी या संपूर्ण ढिसाळ कारभाराबद्दल नागरिक संतापले असून, तहसीलदार वडवणी यांनी तातडीने लक्ष घालून स्वच्छतागृह सुरू करावे, गुत्तेदाराचे बिल, हस्तांतरण, पाण्याची सोय – सर्व प्रक्रियेचा तात्काळ निपटारा करावा, अशी जोरदार मागणी जनतेतून होत आहे. जनतेचा आवाज एकच – वीस लाखांचे स्वच्छतागृह उभारून कुलूप लावण्याचा तमाशा बंद करा; स्वच्छतागृह तात्काळ सुरू करा!

## बीडमध्ये बोगस दिव्यांग

लाभधारकांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात येत आहे. प्रमाणपत्र वेळेत न दिल्याने आणि पुरावे अपुरे असल्याने १०० हून अधिक जणांच्या चौकशीला सुरुवात झालीय. यात १८ कर्मचाऱ्यांनी युडीआयडीआय कार्ड सादर केले नव्हते. त्यांना कार्ड सादर करण्यासाठी मुदत देण्यात आली. मात्र तरी देखील त्यांनी कार्ड सादर न केल्याने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली. आता सर्व दिव्यांग कर्मचाऱ्यांची रुग्णालयामार्फत दिव्यांगत्व पडताळणी केली जाणार आहे. महाराष्ट्रात बनावट अपंगत्व प्रमाणपत्रांच्या वाढत्या प्रमाणाला आळा घालण्यासाठी, महाराष्ट्र अपंग व्यक्ती विभागाचे सचिव तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार मोठ्या प्रमाणात पडताळणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) जितिन रहमान यांनी अनुपालन चौकशीनंतर १४ शिक्षकांना निलंबित करण्याचे आदेश दिले. राज्यभरातील अनेक लोक बनावट अपंगत्व प्रमाणपत्रांच्या आधारे सरकारी नोकऱ्या आणि योजनांचा लाभ घेत होते. बीड जिल्ह्यातील अपंग कर्मचाऱ्यांच्या पडताळणी दरम्यान , अनिवार्य अद्वितीय अपंगत्व ओळख प्रमाणपत्र (णऊखऊ) सादर न केल्याबद्दल जिल्हा परिषदेच्या १४ शिक्षकांना निलंबित करण्यात आले.

## घरकुलधारकांना

जहागीरदार, लालू जहागीरदार यांनी बीड तहसील कार्यालयात जाऊन तहसीलदार शेळके साहेब यांची भेट घेऊन घरकुलधारकांना शासनाच्या नियमानुसार वाळू उपलब्ध करून देण्यात यावे अशा मागणीचे निवेदन देण्यात आले आहे.

## विद्यार्थी प्रश्न मार्गी

विद्यार्थ्यांसाठी रोजगार उपलब्धता किंवा तातडीची आर्थिक मदत. विद्यार्थी संघ निवडणुका त्वरित सुरू करणे. इंटर्नशिप, ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रणाली प्रभावी करणे. विद्यापीठ/महाविद्यालय शुल्कवाढ आटोक्यात आणणे. शिष्यवृत्ती, फेलोशिप वेळेत वितरित करणे. परीक्षा वेळापत्रक निश्चित करणे व निकाल वेळेत देणे. आदिवासी व अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी सुविधा वाढविणे. महाविद्यालयीन कॅम्पसमध्ये सुरक्षा, स्वच्छता व पिण्याच्या पाण्याची सोय. विद्यार्थिनींसाठी स्वच्छतागृह, सॅनिटरी नेपकिन व्हेंडिंग मशीन आदी सुविधा. कॅन्टीनमध्ये दर्जेदार व परवडणारे भोजन. जिल्हाध्यक्ष अविनाश डरफे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून शासनाने त्वरित सकारात्मक निर्णय घ्यावेत, हीच आमची अपेक्षा आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी हे निवेदन स्वीकारत शासनाकडे पाठविण्याचे आश्वासन दिले.

## अवैध रेती (वाळू )

पावले उचलावीत. गुंज येथे अवैध वाळूसाठा जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे अवैध रेती उत्खननकर्त्यांमध्ये मोठी धास्ती निर्माण झाली आहे. ही कारवाई पाथरीच्या उपविभागीय अधिकारी संगीता चव्हाण व तहसीलदार शंकर हंडेश्वर यांच्या मार्गदर्शनात नायब तहसीलदार धोपे, मंडळाधिकारी बागुल, तलाठी साजिद, तायनक, कोतवाल चव्हाण यांच्या पथकाने केली. या छाप्यात अवैध उत्खननासाठी वापरण्यात येणारे चार तराफे, पाईप, उपकरणे व अन्य साहित्य जाळून नष्ट करण्यात आले.

## ॲड.संध्या राजपूत

मराठवाडा विभागाची मोठी जबाबदारी सोपवली आहे. महिला नेत्यांवर मोठी जबाबदारी दिली असून भाजप महिला मोर्चाच्या या 'रणरागिणीं'वर अत्यंत महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. भाजपचे नेते नामदार मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस , प्रदेशाध्यक्ष रविंद्रदादा चव्हाण, निवडणूक प्रमुख तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेजी, मंत्री पंकजाताई मुंडे, आणि महिला प्रदेश अध्यक्ष चित्राताई वाघ यांनी हा निर्णय घेतला आहे. ही समिती संपूर्ण महाराष्ट्रात विभाग निहाय निवडणुकांचे संचलन करणार असून, ड. राजपूत आता मराठवाड्याच्या आठही जिल्ह्यांमध्ये (औरंगाबाद/छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद/धाराशिव, परभणी, हिंगोली, नांदेड) महिला मोर्चाच्या माध्यमातून विश्वास, विकास आणि सुरक्षा हे पक्षाचे ध्येय प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी पार पाडतील. ड. संध्या राजपूत यांची प्रतिक्रिया देताना म्हटले आहे आपल्या नियुक्तीनंतर, ड. संध्या राजपूत यांनी सर्व वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले. धन्यवाद ताईसाहेब..! स्थानीय स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांसाठी महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेश निवडणूक संचालन समिती गठीत झाली आहे. आपले नामदार मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि आपले प्रदेशाध्यक्ष रविंद्रदादा चव्हाण तसेच आपले निवडणूक प्रमुख तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेजी, मंत्री पंकजाताई मुंडे, महिला प्रदेश अध्यक्ष चित्राताई वाघ यांनी भाजप महिला मोर्चाच्या आपल्या रणरागिणींवर अत्यंत महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे, असे त्या म्हणाल्या. त्यांनी पक्षाने दिलेली जबाबदारी पूर्ण क्षमतेने पार पाडण्याचा विश्वास व्यक्त केला. महाराष्ट्राच्या प्रत्येक विभागात, प्रत्येक घरापर्यंत विश्वास, विकास आणि सुरक्षा पोहोचवण्याची जबाबदारी! मी लवकरच माझी निवडणूक संपल्यानंतर कामाला लागते. ताईसाहेब, आपण दिलेली जबाबदारी मी पूर्णपणे पार पाडेल. धन्यवाद ताई साहेब! अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. ॲड.राजपूत यांच्या या निवडीमुळे मराठवाडा विभागात भाजप महिला मोर्चाला अधिक बळ मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

पान १ वरून

## शाळा – कॉलेज

केली आहे. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर मोहीम राबवली आहे. शाळा किंवा महाविद्यालयाच्या शंभर मीटर परिसरात गुटखा विक्रीचे प्रकार आढळल्यास त्या परिसरातील टपऱ्या किंवा दुकानांवर संयुक्त कारवाई करण्याचे निर्देश पोलिसांना दिले आहेत. त्याचबरोबर ही कारवाई स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समन्वयाने केली जाणार आहे. तसेच ड्रग्जच्या आहारी गेलेल्या व्यक्तींसाठी पुनर्वसन केंद्रांची आवश्यकता आहे. मुंबई महानगरमध्ये दर्जेदार पुनर्वसन केंद्रांची कमतरता असून शासन यासंदर्भात आवश्यक पुढाकार घेणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

अनेक गुन्हे नोंदवले

राज्यभरात पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर कारवाई केली असून विविध जिल्ह्यांमध्ये एकूण शेकडो गुन्हे दाखल करण्यात आले आहे. यात नवी मुंबईत १ हजार १४४, अहिल्यानगर येथे १८५, जालना ९०, अकोला ३५, नाशिक १३१, चंद्रपूर २३०, सोलापूर १०८, बुलडाणा ६६४ तसेच नागपूर आणि यवतमाळ जिल्ह्यांत १ हजार ७०६ गुन्हे नोंदवण्यात आल्याची माहितीही फडणवीस यांनी दिली.

## कुत्र्यांचा प्रश्न

'भटक्या कुत्र्यांची बाजू घेणाऱ्या प्राणीमित्रांच्या घरी एकही कुत्रा दिसत नाही. त्यांच्या घरी हे कुत्रे सोडल्यानंतर चावा काय असतो ते कळेल. पुण्यात एप्रिल ते जून २०२५ या काळात भटक्या कुत्र्यांनी आठ हजार नागरिकांना चावा घेतला. विद्यार्थी, महिलांचे भटक्या कुत्र्यांपासून संरक्षण करण्यासाठी उद्याने आणि इतर सार्वजनिक ठिकाणी पथके ठेवायला हवीत,' अशी मागणीही त्यांनी केली.

## महाराष्ट्रात भीक

वातावरण तापले. शिवसेनेच्या आमदार मनीषा कायंदे , राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी आणि तालिका सभापती नीलम गोऱ्हे यांनी विधेयकाबाबत थेट नाराजी दर्शवली. विशेषतः विधेयकाच्या शीर्षकात बदल करण्याची गरज असल्याची चर्चा झाली. त्याचबरोबर 'महारोगी' हा शब्द शैलीतून वगळण्यात आला असला, तरी विधेयकाच्या शीर्षकात आणि मजकुरात असलेल्या ताळमेळाच्या अभावाकडे एकनाथ खडसेंनी लक्ष वेधले.

गोऱ्हे यांनी तर विधेयकाबाबत देण्यात आलेल्या स्पष्टीकरणावर नाराजी व्यक्त करत संबंधित विभागाकडून अधिक स्पष्ट आणि सुसंगत माहिती देण्याची मागणी केली. इतक्या आक्षेपांनंतरही चर्चेला आवश्यक वेळ न देता विधेयक तत्काळ मंजूर करण्यात आल्याने सदस्य अधिकच नाराज झाले.

सदस्य असमाधानी असतानाही अंतिम निर्णय घेण्यात आल्यानंतर आता पुढील दिशा दाखवण्यासाठी सभापतींच्या दालनात शनिवारी महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत विधेयकातील विसंगती, सदस्यांच्या सूचना आणि पुढील प्रक्रिया यावर चर्चा होणार आहे. विधेयक मंजूर झाल्यानंतरही संबंधित बाबींचा पुनर्विचार करण्याची भूमिकाही काही सदस्यांनी मांडली आहे.

राज्यात भीक मागण्यावर पूर्णपणे बंदी आणण्याच्या उद्देशाने हे विधेयक तयार करण्यात आले आहे. सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने आणि सार्वजनिक व्यवस्थेचे रक्षण करण्याच्या हेतूने हा कायदा गरजेचा असल्याचे सरकारचे मत आहे. मात्र, या कायद्यामुळे भिकाऱ्यांचे पुनर्वसन, त्यांच्या सुरक्षिततेची हमी आणि पर्यायी सहाय्य यांविषयी अनेकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.

महाराष्ट्रात भीक मागण्यास बंदी घालण्याचा निर्णय हा सामाजिक दृष्ट्या महत्वाचा ठरू शकतो, पण त्याची अंमलबजावणी किती प्रभावी होणार आणि कितपत संवेदनशीलतेने केली जाणार, हे येणारे दिवस ठरवतील. विधेयक गोंधळात मंजूर झाल्याने पुढील प्रक्रिया, दुरुस्ती आणि अंमलबजावणीतील अडचणींबाबत आता सर्वांचे लक्ष शनिवारी होणाऱ्या बैठकीकडे आहे.

## आष्टीच्या रस्त्यावर

दिसले. प्रवासी बिबट्यांना पाहून घाबरले, मात्र त्यांनी प्रसंगावधान राखून बिबट्यांची हालचाल आपल्या कॅमेऱ्यात कैद केली. हे बिबटे काही वेळ रस्त्यावर फिरून बाजूच्या शेतात निघून गेले. सध्या हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, परिसरातील नागरिकांमध्ये मोठी दहशत पसरली आहे.

या बिबट्यांच्या दर्शनामुळे परिसरातील नागरिकांच्या मनात भीतीचे वातावरण आहे, कारण ऑक्टोबर महिन्यात याच परिसरात एका शेतकऱ्याचा बिबट्याच्या हल्लयात बळी गेला होता. १३ ऑक्टोबर रोजी बावी गावात राजेंद्र विश्वनाथ गोल्हार (वय ३६) हे शेतकरी जनावरं घेऊन शेतात गेले असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर अचानक हल्ला करत त्यांचा फडशा पाडल्याची दुर्दैवी घटना घडली होती.

या घटनेची कटू आठवण ताजी असतानाच आता तीन बिबटे दिसल्यामुळे बीडसांगवी, कोहिणी, बावी, दरेवाडी, किन्ही आणि परिसरातील नागरिकांनी रात्रीच्या वेळी घराबाहेर न पडण्याचे आणि फिरताना अत्यंत काळजी घेण्याचे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. वन विभागाने तातडीने या बिबट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## तत्कालीन नायब

या बनावट आदेशामुळे शेतकऱ्यांची दिशाभूल झाली असल्याची माहितीही समोर आली आहे. महसूल विभागातील अधिकारी, तलाठी यांच्याही कामकाजावर त्याचा परिणाम झाला. प्रशासनाची दिशाभूल करून स्वतःच्या पदाचा गैरवापर केल्याचा गंभीर आरोप गुन्ह्यात करण्यात आला आहे.कायद्याने अर्धन्यायिक प्रक्रिया ही अत्यंत संवेदनशील व जबाबदारीची असते. त्यात कोणतेही आदेश तहसीलदारांच्या थेट सही शिवाय वैध ठरत नाहीत. पण संबंधित नायब तहसीलदाराने तहसीलदार असल्याचा भास निर्माण करून आदेश देणे, सहीची बनावट प्रत तयार करणे आणि ती शासन अधिकाऱ्यांना पाठवणे हे सर्व गंभीर बेकायदेशीर कृत्य ठरल्याने आता त्यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

फसवणूक, सरकारी कागदपत्रांची बनावट तयार करणे आणि अधिकारांचा गैरवापर यांसह अनेक गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे. या प्रकरणामुळे केज तालुक्यातच नव्हे तर संभाजीनगर महसूल व जिल्हाधिकारी कार्यालयातही खळबळ उडाली आहे. महसूल विभागातील अधिकाऱ्यांची विश्वसनीयता डागाळणाऱ्या या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याबाबत वरिष्ठांकडूनही निर्देश देण्यात आले आहेत.या प्रकरणामुळे महसूल विभागातील अंतर्गत प्रक्रियांचे पुनरावलोकन, तसेच कामकाजात पारदर्शकता आणि दस्तऐवज पडताळणी अधिक कडक करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. स्थानिक पातळीवर या घडामोडीची जोरदार चर्चा सुरू असून, संबंधित अधिकाऱ्यावर कडक कारवाई अपेक्षित असल्याचे सूत्रांनी सांगितले.

केज तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या तक्रारी वरून तत्काकालीन नायब तहसीलदार तथा संभाजी नगरच्या जिल्हाधिकारी कार्यालयातील संजय गांधी विभागाच्या तहसीलदार आशा वाघ यांच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु र नं ६७३/२०२५ भा न्या सं ३१८(४), ३३७, ३३६(२), ३१६(२) नुसार गुन्हा दाखल झाला आहे.पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक महेश क्षीरसागर हे पुढील तपास करीत आहेत.